# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
### १७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.बीएड.तपासणी/२०२३/(२८७०/२३)/१३५८ दि ०३-०५-२०२३

**महत्वाचे/ई-मेलव्दारे**

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या

सर्व अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण व

कायम विनाअनुदानित / विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,

**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

**विषय:- अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण व कायम विनाअनुदानित / विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत..**

संदर्भ- मा.संचालनालयाकडील पत्र क्र.बी.एड-२५२३/प्र.क्र.७६/सीईटीसेल/५३२७, दिनांक- २६-०४-२०२३

उपरोक्त विषयाच्या संदर्भात राज्यातील अशासकीय अनुदानित शारीरिक शिक्षण व कायम विना अनुदानित/ विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरीता शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याच्या अनुषंगाने महाविद्यालयांकडुन एन.सी.टी.ई/ आर.सी.आय ने विहीत केलेल्या निकषांची पूर्तता केली आहे किंवा नाही याबाबत तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/शिशुस/बैठक दि.११-०४-२०२२/सीईटी कक्ष/४६६७ दि.०४-०५-२०२२ विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे Academic Audit करण्याच्या सुचनाही दिलेल्या आहेत.

यास्तव संबंधित महाविद्यालयांनी एन.सी.टी.ई/ आर.सी.आय ने विहीत केलेल्या निकषांची पूर्तता केली आहे किंवा कसे, याची खातरजमा करणेसाठी शासन प्रतिनिधी दि.०८-०५-२०२३ ते २२-०५-२०२३ या कालावधीत महाविद्यालयासा प्रत्यक्ष भेट देणार आहेत. यासाठी यापुर्वी मा.संचालनालयामार्फत देण्यात आलेल्या विहीत परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब नुसार कागदपत्रे / दस्तऐवज तपासणीसाठी महाविद्यालयस्तरावर अद्ययावत ठेवण्यात यावीत.

**(डॉ.किरणकुमार बोंदर)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१.

सोबत- परिशिष्ट- अ व ब

प्रत- मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.